खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

आतील पानात वाचा
- 'पंतप्रधानांचे' आवाहन आणि 'नेत्यांचे' फोटोसेशन...
- भविष्यातील सर्व परीक्षा नीटनीटक्या होवोत...
- बनावट डॉक्टरविरोधात राहुरी पोलिसांची कारवाई; उपचारासाठी वापरलेली औषधे जप्त...


वर्ष : ०५ | अंक : २७५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१७ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## इतिहासातील सर्वात तीव्र 'एल निनो' चा अंदाज; यंदा जूनमध्ये सक्रिय होणार

### संपूर्ण मान्सून हंगामावर होणार परिणाम...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, पुणे :** विषुववृत्तीय प्रशांत महासागराचे तापमान वेगाने वाढत असून, आता जूनमध्येच ' एल निनो 'ची स्थिती निर्माण होणार असल्याचा अंदाज अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआच्या क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरने (सीपीसी) वर्तवला आहे. मान्सूनच्या सुरुवातीलाच एल निनो विकसित होणार असल्याने यंदाच्या संपूर्ण हंगाम ावर एल निनोचा प्रभाव राहू शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे.



**हिवाळ्यातही सक्रिय राहणार?**

सीपीसीने नुकत्याच जारी केलेल्या अंदाजानुसार, विषुववृत्तीय प्रशांत महासागरात सध्या असलेली न्यूट्रल स्थिती लवकरच 'एल निनो'मध्ये रूपांतरित होण्याची शक्यता आहे. सलग पाचव्या महिन्यात तेथील सम द्रपृष्ठाच्या तापमानात वाढ नोंदली गेली असून, येत्या जूनमध्ये 'एल निनो'ची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आता ८२ टक्के झाली आहे. ही स्थिती पुढेही कायम राहून उत्तर गोलार्धातील हिवाळ्यात (डिसेंबर २६ ते फेब्रुवारी २७) एल निनो सक्रिय राहण्याची शक्यता ९६ झाली टक्के आहे. एकीकडे देशात मान्सूनचे आगमन होत असतानाच प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय होणे ही बाब हंगामी पावसाच्या दृष्टीने चिंताजनक असल्याचे हवामान तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

यंदाचा 'एल निनो' इतिहासातील सर्वात तीव्र (समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा ३ अंश किंवा त्यापेक्षाही जास्त) ठरणार असल्याचा अंदाज युरोपीय मॉडेलद्वारे वर्तवण्यात आला होता. मात्र, सीपीसीच्या अंदाजामध्ये 'एल निनो'च्या तीव्रतेविषयी साशंकता व्यक्त करण्यात आली आहे. या अंदाजानुसार, नोव्हेंबर- डिसेंबरदरम्यान विषुववृत्तीय प्रशांत महासागराचे तापम ान अधिकाधिक १.५ ते २.० अं शांच्या दरम्यान राहू शकते. जून- जुलैमध्ये क्षीण एल निनो, ऑगस्ट- सप्टेंबरमध्ये मध्यम स्वरूपाचा, तर ऑक्टोबरपासून पुढे तीव्र किंवा अतितीव्र एल निनोची शक्यता अधिक आहे.

**भारतासह आशियासमोर आव्हान**

- एल निनो सक्रिय असताना प्रशांत महासागरावर कमी दाबाची स्थिती राहून भारतीय उपखंडावरील मोसमी वाऱ्यांचा प्रवाह क्षीण होतो. या भागावरील बाष्पही पूर्वेकडे खेचले गेल्याने मान्सून काळातील पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहते.
- भारतात एल निनो पाठोपाठ येणारा २०२७ चा उन्हाळा तीव्र स्वरूपाचा राहून उष्णतेच्या लाटांची संख्या वाढण्याची आणि पुढील वर्षीच्या मान्सूनचे आगमन उशिराने होण्याची शक्यता.
- एल निनोच्या वर्षी २०२७ मध्ये जागतिक पातळीवर विक्रमी तापम ानाची नोंद होण्याचा अंदाज. सामुद्री जैवविविधतेवर प्रतिकूल परिणाम शक्य.
- पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थितीमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर ताण आलेला असतानाच एल निनोच्या संकटामुळे आशिया खंडाच्या अर्थव्यवस्थेला आणखी फटका बसण्याची शक्यता.

## चंद्रपूर जिल्ह्याचे सुपुत्र कोलंबियाचे राजदूत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. या संदर्भात विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने डॉ. विनोद बहादे यांची दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात भारताचे राजदूत म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीने चंद्रपूरच्या गौरवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारतीय परराष्ट्र सेवेतील २००७ च्या तुकडीतील अधिकारी असलेले डॉ. विनोद बहादे हे सध्या परराष्ट्र मंत्रालयात सहसचिव म्हणून दहशतवादविरोधी विभागात कार्यरत आहेत.

विशेष म्हणजे डॉ.विनोद बहादे हे मूळ चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तालुक्यातील विसापूर गावचे सुपुत्र आहेत. भारतीय परराष्ट्र सेवेतील २००७ च्या तुकडीतील अधिकारी असलेल्या डॉ. विनोद बहादे यांनी यापूर्वी व्हिएतनामची राजधानी हनोई, ऑस्ट्रेलियातील सिडनी, इजिप्तची राजधानी कैरो आणि अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डी.सी. येथील भारतीय दूतावासांमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे चंद्रपूर जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अभ्यासू वृत्ती, मुत्सद्देगिरी आणि प्रशासनातील कौशल्याचा बळावर त्यांनी परराष्ट्र सेवेत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आंतरराष्ट्रीय संबंध, सुरळा विषय आणि दहशतवादविरोधी धोरणांवरील त्यांचा सखोल अभ्यास विशेष मानला जातो.

ग्रामीण भागातून शिक्षण घेत जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास अनेक युवकांसाठी प्रेरणादायी मानला जातो.

## सरकारी योजनांच्या नावाखाली महिलांची मोठी फसवणूक

### विंचूरमध्ये 'दिव्यज्योत' संस्थेकडून अडीच लाखांचा गंडा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील विंचूर परिसरात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे खोटे आमिष दाखवून ६४ महिलांची सुमारे २ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'दिव्यज्योत बहुउद्देशीय संस्था' या नावाखाली हा बनाव रचण्यात आला असून, याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात एका महिलेसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, हनुमान नगर (विंचूर) येथील सौ. मनिषा प्रमोद कडलग यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. आरोपी संजय अभिमान बोराळे, एक महिला आरोपी (दोघे रा. सोहम सिटी, लासलगाव) आणि विशाल कान्हू गरूड (रा. कोटमगाव, ता. निफाड) यांनी 'दिव्यज्योत बहुउद्देशीय संस्था' स्थापन केली होती. या संस्थेच्या माध्यमातून म हिलांना मोफत शिवणकाम, ब्युटी पार्लर प्रशिक्षण आणि 'विश्वकर्मा योजने'अंतर्गत शिलाई मशीनसह १५ हजार रुपये रोख मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

**अशी केली फसवणूक !**

**सवलतीचा मोह :** पिठगिरणी, वॉशिंग मशीन, फ्रिज यांसारख्या वस्तू केवळ २५ टक्के रक्कम भरून मिळतील आणि उर्वरित रक्कम शासन अनुदानातून भरेल, असे महिलांना सांगण्यात आले.

विश्वास संपादन: सुरुवातीला काही महिलांना प्रशिक्षण देऊन १५ हजार रुपयांचे (बनावट/न वटणारे) धनादेश देण्यात आले, जेणेकरून महिलांचा विश्वास बसेल.

**वसुलीचा फंडा :** विश्वास बसल्यानंतर आरोपी विशाल गरूड याने गावोगावी जाऊन महिलांकडून 'फोन पे'द्वारे पैसे गोळा केले. फिर्यादी महिलेचे २० हजार आणि इतर ६४ महिलांकडून प्रत्येकी ३,५०० ते १०,००० रुपये असे एकूण २ लाख ५० हजार रुपये उकळले.




पैसे भरूनही दीर्घकाळ कोणतीही वस्तू किंवा लाभ न मिळाल्याने आणि आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने आपली फसवणूक झाल्याचे महिलांच्या लक्षात आले. ही टोळी निफाडसह सिन्नर आणि येवला तालुक्यातील महिलांनाही टार्गेट करत असल्याचे समोर आले आहे.

**पोलीस कारवाई :** याप्रकरणी लासलगाव पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा (रजि. नं. १५१/२०२६) दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## केदारेश्वर देवस्थानातील दानपेटी चोरीचा उलगडा
## राहुरी पोलिसांची धडाकेबाज कारवाई



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१६, राहुरी :** म्हैसगाव येथील प्रसिद्ध श्री क्षेत्र केदारेश्वर देवस्थान मंदिरातील दानपेटी फोडून चोरी करणाऱ्या आरोपीस राहुरी पोलिसांनी अवघ्या चार तासांत अटक करत गुन्ह्याचा छडा लावला. पोलिसांच्या या जलद आणि अचूक कारवाईमुळे परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

दिनांक १४ जून २०२६ रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास ते १५ जून रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने मंदिरात प्रवेश करून दानपेटी फोडली व त्यामधील रोख रक्कम चोरून नेली होती. या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ५२६/२०२६ अन्वये बीएनएस कलम ३०५ व ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी तपासाची सूत्रे वेगाने हलवली. गोपनीय माहितीच्या आधारे पोहेकॉ रामनाथ सानप, पोहेकॉ राजू पुंड आणि पोलीस कॉन्स्टेबल गणेश मैड यांनी संशयिताचा शोध घेत आरोपीस ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव दीपक राधु आंबेकर (वय २८, रा. कोळेवाडी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) असे असून त्याच्याकडून अधिक चौकशी सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलीस अधीक्षक सोम नाथ वाघचौरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. राहुरी पोलीस स्टेशनच्या पथकाने दाखविलेल्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मिरा-भाईंदरची सुरक्षितता आणि शहराची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी भाडेकरू पडताळणी अत्यावश्यक : मुझफ्फर हुसैन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१६, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांची सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था आणि शहराची सकारात्मक प्रतिमा कायम राखण्याच्या उद्देशाने मिरा-भाईंदर प्रॉपर्टी डीलर्स असोसिएशनची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष मुझफ्फर हुसैन यांनी शहरातील सर्व प्रॉपर्टी डीलर्स, एजंट्स आणि संबंधित व्यावसायिकांना तसेच सोसायटी मॅनेजिंग कमिटीला भाडेकरूंना मालम त्ता भाड्याने देण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रांची काटेकोर पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या.




यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, उत्पन्नाचा पुरावा, इन्कम टॅक्स संबंधित माहिती, पोलिस व्हेरिफिकेशन तसेच इतर आवश्यक ओळखपत्रांची तपासणी अनिवार्यपणे करण्यात यावी, यावर विशेष भर देण्यात आला.

मुझफ्फर हुसैन यांनी यावेळी सांगितले की, मिरा-भाईंदर हे वेगाने विकसित होणारे आणि विविध समाजघटकांनी एकत्र नांदणारे शहर आहे. मात्र, बाहेरून येणाऱ्या काही संशयास्पद व्यक्तींमुळे अनेकदा कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात तसेच शहराच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रत्येक प्रॉपर्टी व्यवहार अधिक जबाबदारीने आणि पारदर्शक पद्धतीने होणे आवश्यक आहे.

शहराची सुरक्षितता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून सम ाजातील प्रत्येक घटकाने त्यासाठी योगदान देणे गरजेचे आहे. प्रॉपर्टी डीलर्स आणि एजंट्स यांनी सतर्क राहून आवश्यक पडताळणी केल्यास भविष्यातील अनेक गैरप्रकार रोखणे शक्य होईल, असे मत मुझफ्फर हुसैन यांनी व्यक्त केले.

तसेच, नागरिकांचा विश्वास कायम राखण्यासाठी आणि शहर अधिक सुरक्षित करण्यासाठी प्रशासन, प्रॉपर्टी डीलर्स असोसिएशन आणि नागरिक यांच्यात समन्वय वाढवून पुढील काळात अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. आरोपी ला कोणता धर्म नसतो.

यासंदर्भात जामा मस्जिद अल शम्स यांच्या वतीने नागरिकांना भाडेकरू पडताळणीबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले असून मिरा-भाईंदरमधील सर्व म शिदींमधूनही जनजागृतीसाठी विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

## वनविभागाने राज्यातील २१६ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या नियमित बदल्या

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** राज्याच्या महसूल व वनविभागाने राज्यातील २१६ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या नियमित बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. या संदर्भात सूत्रांच्या माहितीनुसार या बदल्यांमध्ये चंद्रपूर जिल्ह्यात एकूण १५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, मोहर्ली बफरचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे यांना प्रशासकीय कारणास्तव कार्यरत पदावर एका वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी सुधीर सुरपाम यांची चंद्रपूर जिल्ह्यातील ताडगाव संशोधन केंद्रात बदली करण्यात आली आहे. मोहर्ली ताडोबा कोअरचे वनपरिक्षेत्र अधिकारी अरुणकुमार गौंड यांची बांबू रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर, चिचपल्ली येथे नियुक्ती करण्यात आली आहे. मुरूमगाव पश्चिम, गडचिरोली येथील आरएफओ मृणाली करहाडे यांची चंद्रपूर संशोधन केंद्र क्रमांक १ येथे बदली करण्यात आली. रुंदन काटकर यांची ताडोबा कोअरच्या कोलसा येथून कोठारी प्रादेशिक विभागात बदली करण्यात आली आहे. सुरेखा दहीकर यांची ताडोबा कोअरच्या कोळसा वनपरिक्षेत्रात नियुक्ती झाली आहे. आकाश मल्लेलवार यांची गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी वनपरिक्षेत्रात, आम्रपाली खोब्रागडे यांची जिवती वनपरिक्षेत्रात, तर योगिता मडावी यांची कन्हारगाव वनपरिक्षेत्रात बदली करण्यात आली आहे. सुभांगी कृष्णापूरकर यांची ताडोबा बफरच्या कोठारी वनपरिक्षेत्रात, किशोर देऊरकर यांची ताडोबा कोअरच्या कारवा वनपरिक्षेत्रात नियुक्ती करण्यात आली आहे. हिंगणघाट सामाजिक वनीकरण विभागातून स्वाती लांडे यांची एसटीपीएफ-३, पांगडी (मूल) येथे बदली करण्यात आली आहे. ब्रह्मपुरी उत्तरचे आरएफओ सचिन नरड यांची सामाजिक वनीकरण, मलकापूर (अकोला) येथे बदली करण्यात आली आहे. श्रीनिवासी गव्हारे यांची ताडोबा बफरच्या धाबा वनपरिक्षेत्रात नियुक्ती करण्यात आली आहे. ताडोबा कोअरच्या कारवा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद जांभुळे यांची चौडमपल्ली-चपराळा वनपरिक्षेत्रात बदली करण्यात आली असून, संदीप लंगडे यांची जिवती वनपरिक्षेत्रातून नागपूर वनपरिक्षेत्र वर्किंग प्लॅन विभागात नियुक्ती करण्यात आली आहे.

अक्षराज






## कुंभभूमीच्या झळाळीचे स्वप्न

मुंबई-पुण्यासोबत सुवर्ण त्रिकोणातील नाशिक व परिसराचे भाग्य लवकरच उजळणार आहे. आजची स्थिती बघता, सिंहस्थ कुंभमेळ्याची प्रस्तावित ३५ हजार कोटी रुपयांची कामे ‘डेडलाइन’मध्ये पूर्ण होतील की नाही याची खात्री वाटत नसली, तरी या झिरपणाऱ्या पैशांतून पुढील दहा-बारा वर्षांत नाशिक जिल्ह्याची अर्थव्यवस्था चक्क तीन लाख कोटी रुपयांची होणार आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुंभभूमीतील उद्योगकुंभात हे नवस्वप्न दाखविले. प्रयागराजच्या कुंभमेळ्यात पर्वणी काळात दीड लाख कोटींची उलाढाल झाली होती. नाशिक जिल्ह्याची अर्थव्यवस्था काही वर्षांत का होईना त्याच्या दुप्पट होणे, हेही अभिमानास्पदच. शिवाय, कुंभ आणि उद्योगांचा संगम घडवून सुमारे १४ हजार कोटींचे गुंतवणूक करारही फडणवीस यांनी प्रत्यक्षात करून दाखविले. या आर्थिक उलाढालीच्या शंखनादाने नाशिककर भारावले आहेत व नवे आकडे ऐकून अचंबितही झाले आहेत!

रेवडी संस्कृती आपल्याला नवी नाही. बडे आकडे आणि बड्या प्रकल्पांच्या घोषणा हासुद्धा त्याचाच भाग. मंत्रभूमी नाशिकही त्यास अपवाद नव्हतेच. वरिष्ठ मंत्री, अधिकाऱ्यांनी दौरे करावेत, काळाराम ते त्र्यंबकेश्वराच्या चरणी माथा टेकवावा आणि जाताजाता भरघोस आश्वासने पदरी टाकावीत, या गोष्टीला नाशिककर सरावले आहेत. निओ मेट्रो प्रकल्प, आयटी पार्क, लॉजिस्टिक पार्क, द्वारका-नाशिकरोड उड्डाणपूल अशा किमान बारा-पंधरा प्रकल्पांच्या घोषणाही त्याच पठडीतल्या. पैकी काही निवडणूक जुमल्यातल्या. त्यामुळे त्या आजवर कागदावरच राहिल्या वा काही तेथूनही पुसल्या गेल्या.

राज्याच्या उद्योगमंत्र्यांनी तर दर खेपेला नवी आकडेमोड केली. नेमके कोणते उद्योग आले किंवा येणार आहेत, अशी विचारणा केल्यावर त्याचा तपशील तूर्तास देता येणार नाही, या उत्तरापलीकडे हाती फारसे काही लागले नाही. उद्योग-व्यावसायिकांचे अनेक प्रश्न ‘जैसे थे’ आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या घोषणेकडेही साशंकतेने बघितले जाणे स्वाभाविकच. दहा-बारा वर्षांत घोषणा झालेली विकासकामे प्रत्यक्षात साकारली न गेल्याने जी काही उलाढाल होऊ शकली नाही, ते आर्थिक नुकसान नव्हे काय? नव्यांची घोषणा करताना ‘जुने जाऊ द्या मरणालागुनी’चा प्रत्यय सातत्याने येतो. अपवाद वगळता आहे त्या ‘मदर इंडस्ट्रीज’च्या विस्ताराशिवाय एकही मोठा प्रकल्प परिसरात आलाच नाही. शेती आधारित अर्थव्यवस्था असली, तरी कृषीप्रक्रिया उद्योगांची वानवा आहे. आयटी क्षेत्राबद्दल तर काही न बोललेच बरे. मग तीन वर्षांत ५७ हजार कोटींची गुंतवणूक जिल्ह्यात नेमकी झाली कोठे? करारांच्या यादीत जर स्थानिक उद्योजक असतील, तर तिला गुंतवणूक म्हणायचे का? मग प्रत्येक माणसाने स्वतःच्या घरात वा उद्योग-व्यवसायात केलेली गुंतवणूकसुद्धा मोजून काढली गेली की काय, अशीही शंका येते. ‘दत्तक नाशिक’चा कटू अनुभवही ताजा आहेच. कदाचित तेव्हा विशेष काही करू शकले नाही म्हणून भरपाईचा हा प्रयत्न असावा.


ताज्या पाहणी अहवालानुसार, नाशिक जिल्हा वार्षिक तीन लाख रुपये उत्पन्नासह दरडोई उत्पन्नात राज्यात सहाव्या क्रमांकावर आहे. येत्या दहा वर्षांत जिल्ह्याची अर्थव्यवस्था काही लाख कोटींची बनणार असेल, तर नागरिकांचे उत्पन्नही नक्कीच काही पटींनी वाढेल. परंतु, भूतकाळात खरोखरच हजारो कोटी पाझरले असतील, तर दरडोई उत्पन्नातही लक्षणीय सुधारणा दिसायला हवी होती.

दावोसच्या धर्तीवर राज्यात जिल्हाकेंद्रित गुंतवणूक परिषदांना सुरुवात झाली. कदाचित त्यापोटी गुंतवणुकीने गगनभरारी घेतली असावी. खरे तर गुंतवणूक, उत्पन्न जाहीर करतानाच कर्जाचा भारही सांगायलाच हवा. असो. तूर्तास सिंहस्थासाठी अख्खे नाशिक खोदून ठेवले असले, तरी गुंतवणूक वा आर्थिक उलाढालीच्या आकड्याने कोट्यवधीची झेप घेतली, हेही नसे थोडके! मधल्या काळात अशोक खरातपासून विविध ‘फाइल्स’ने बदनाम झालेल्या या धार्मिक शहराला ‘शायनिंग इंडिया’प्रमाणे चमकविण्याच्या प्रयत्नांचे स्वागतच करायला हवे. फक्त ही झळाळी प्रत्यक्षात यावी एवढेच!

**- संपत थेटे**

# भविष्यातील सर्व परीक्षा नीटनीटक्या होवोत!

एखाद्याची परीक्षा घेणे म्हणजे त्याला कोड्यात टाकणे, उलटतपासणी करणे, पात्रता पाहणे, चक्रावून टाकणे असे अनेक अर्थ होतात. परंतु ३ मे रोजी झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रवेशासाठीच्या ‘नीट’ परीक्षेमध्ये असे सारे प्रश्न होतेच; परंतु त्यानंतरही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना अजून एक महिना आपल्या संतापाची, संयमाची आणि मानसिक स्वास्थ्याची परीक्षा द्यावी लागणार आहे. त्याचे कारण म्हणजे ‘नीट’ परीक्षेचा पेपर फुटल्याची घटना.



या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार एक प्राध्यापक असल्याचा दावा सीबीआयने केला आहे. हा तज्ज्ञ प्राध्यापक अनेक वर्षे ‘नीट’ प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनेलमध्ये काम करत होता.

सीबीआयच्या माहितीनुसार, त्याने विद्यार्थ्यांना प्रश्न, पर्याय आणि उत्तरे डिक्टेट केली. ३ मे रोजी झालेल्या नीट च्या प्रश्नपत्रिकेत आलेले जवळपास १२० प्रश्न परीक्षेच्या आधी काही दिवसापूर्वी अंदाज म्हणून पसरविण्यात आलेल्या प्रश्नांशी मिळते जुळते होते. या अंदाजित प्रश्नपेढीसाठी विद्यार्थ्यांकडून दहा ते बारा लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचे धागेदोरे जयपूर, गुरुग्राम, नाशिकपासून राजस्थान, हरियाणा बिहार, उत्तराखंड आणि केरळपर्यंत म्हणजेच संपूर्ण देशभर पसरले आहेत. ‘नीट’ परीक्षा ३ मे रोजी देशातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ केंद्रांवर घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. एनटीएला ७ मे रोजी गैरप्रकाराबाबत माहिती मिळाल्यानंतर हे प्रकरण केंद्रीय यंत्रणांकडे सोपवण्यात आले.

आपल्या पुराणकथांमध्ये परीक्षा घेण्याबाबत अनेक कथा, दाखले आणि दृष्टांत उपलब्ध आहेत. भीमाचे गर्वहरण करण्यासाठी श्रीहनुमानांनी त्याची परीक्षा घेतली होती. भगवान शंकर आणि माता पार्वती यांनी गणेश व कार्तिकेय यांची परीक्षा घेतली होती. अशा परीक्षांमधून एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाची तपासणी केली जाते. थोडक्यात, एखाद्याची लायकी मोजण्यासाठीच परीक्षा घेतल्या जातात.

कठोर परिश्रमास पर्याय नाही प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे यांसारख्या सुविचारांतून आपण मुलांना कठोर मेहनत करण्यासाठी प्रेरित करतो. आपल्या मुलांचा कल आणि गुणवत्ता पाहून त्यांना एखाद्या स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यास प्रोत्साहित करतो. मुलेदेखील रात्रंदिवस अभ्यास करू लागतात. झपाटल्यासारखे वाचन, लेखन, गणिती क्रिया आणि सराव करून ती आपले भविष्य घडविण्यासाठी मेहनत घेत असतात. स्वतःची प्रकृती, तहान-भूक सारे काही विसरून ती या स्पर्धेत झोकून देतात.

स्पर्धात्मक परीक्षांमध्ये मुलांच्या कौशल्यांची, बुद्धिमत्तेची आणि क्षमतांची तपासणी होणे अपेक्षित असते. परीक्षेतील विविध प्रश्नप्रकारांतून या गोष्टी पडताळल्या जातात. परंतु अचानक अशा प्रकारच्या पेपरफुटीच्या घटना घडल्या, तर मुलांच्या स्वप्नांवर पाणी फिरते, त्यांच्या उत्साहाला विरजण लागते आणि यंत्रणेवरील विश्वास ढासळतो. मुले निराश होतात. ३ मे रोजीची ‘नीट’ परीक्षा रद्द झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या बातम्याही प्रसारमाध्यमांतून समोर आल्या. खरंतर हे विद्यार्थी व्यवस्थेचेच बळी म्हणावे लागतील.

आजचे जीवन धकाधकीचे आणि जीवघेण्या स्पर्धेचे बनले आहे. इयत्ता बारावीत असताना सर्वच मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्णपणे विकास झालेला नसतो. अशा वेळी डॉक्टर किंवा इंजिनिअर हेच जेमतेम रोजगार देऊ शकणारे पर्याय अनेक पालकांना दिसतात. याही पलीकडे हजारो क्षेत्रे मुलांसाठी खुली असताना, बारावीनंतर मुलांच्या भविष्याबाबत पालक झटपट निर्णय घेऊन मोकळे होतात.मग या परीक्षांच्या दावणीला बांधले जातात. सर्वच मुले डॉक्टर किंवा इंजिनियर होण्यास पात्र नसतात. परंतु इतर अनेक क्षेत्रासाठी आवश्यक असणारी पात्रता आणि व्यक्तिमत्व त्यांच्याकडे असते किंवा घडू शकते. म्हणून पालकांनी बारावीच्या पुढील इतर पर्यायांकडे देखील सकारात्मकतेने पाहणे गरजेचे आहे.

वाढत्या स्पर्धेमुळे कॉपी करण्यापासून ते पेपर लीक आणि गुण वाढवून देण्यासारखे प्रकार अधूनमधून घडत असल्याचे आपण ऐकतो. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर माणसाला परीक्षा द्यावी लागते, हे जरी खरे असले तरी त्या परीक्षांमध्ये जर घोटाळा, बनवाबनवी किंवा पक्षपात झाले , तर परीक्षा देणाऱ्यांचा आत्मविश्वास खचतो.

आता परीक्षा स्वतःवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याचीच परीक्षा यंत्रणांना द्यावी लागणार आहे. त्यासाठी तज्ञ समिती नेमून त्यांच्याकडून अभ्यासपूर्ण उपाययोजना करून घेतल्या जाव्यात. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून भविष्यात परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि नीटनेटक्या पद्धतीने घेतल्या जातील, हा आशावाद आपण बाळगूया.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# ‘पंतप्रधानांचे’ आवाहन आणि ‘नेत्यांचे’ फोटोसेशन

२८ फेब्रुवारी पासुन पश्चिम एशियात/आखातात इराण-ईस्रायल युद्धाची ठिणगी पडली त्यात अमेरिकेने तेल ओतले अजुनही युद्ध चालुच आहे मात्र या युद्धाचा जगाबरोबरच भारतावर देखील मोठा विपरीत परिणाम होत, अगोदरच आर्थिक मंदीचे सावट, बेरोजगारीची समस्या, यांचे संकट असतांना या युद्धाने त्यात भर पडली.

ऊर्जा शेत्रावर तर मोठा विपरीत परिणाम झाला आहे, भारताच्या आयात निर्यातीवर, परकीय चलनावर, देशांतर्गत खते, अन्न धान्ये यावर परिणाम झाला आहे आणि



दिवसेंदिवस भारतासमोरील आव्हाने गंभीर होत चालली आहे, अजुनही युद्ध किती काळ चालेल याबाबत अनिश्चितता आहे आणि युद्ध संपल्यावर देखील परिस्थिती सुधारण्यासाठी बराच काळ जावा लागणार आहे. पावसाळापूर्व कामे रखडली आहे, खतांचा तुटवडा जाणवणार आहे, या ऐकुणच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी 'काटकसरीची सप्तसुत्री' जाहीर करुन देशवासियांना सहकार्याचे आवाहन केले. यामधे

१) विदेशी दौरे टाळा, २)खतांचा वापर कमी करा आणि नैसर्गिक शेतीकडे वळा,३) खाजगी श्रेत्रात वर्क फ्रॉम होम चा अवलंब करा, ४)जास्तीत जास्त स्वदेशी खरेदी करा, ५)वर्षभर सोने खरेदी टाळा, ६)स्वयंपाकात खाद्य तेल कमी वापरा, ७)मेट्रो सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा ऊपयोग असे आवाहन त्यांनी जनतेला केले. खरोखरच काळ कसोटीचा आहे यात शंका नाही. ऐकिकडे भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे, देशात अच्छेदिन आहे, भारत महाशक्ती आहे असे दावे-प्रतिदावे केले जात आहे मात्र सगळी सोंगे वठविता येतात पैशाचे सोंग वठविता येत नाही हे वास्तव आहे. देशासमोरील मोठे आव्हान आहे ते परकिय चलनाचे, गेल्या काही वर्षांपासून विदेशी गुंतवणूकदार मोठ्याप्रमाणावर गुंतवणूक काढुन घेत आहे, युद्धामुळे जे भारतीय नागरिक परदेशातून विदेशी चलन पाठवत होते त्यात मोठी घट झाली आहे त्याच बरोबर भारताची आयात आणि निर्यात या मोठी तफावत असुन ट्रेड डिफिसिट वाढत आहे, आपली निर्यात घटत आहे तर आयात वाढत आहे त्यातच रूपयाांचे अवमूल्यन होत असल्याने जास्तीचे परकिय चलन खर्च करावे लागत आहे. यामुळेच पंतप्रधानांनी देशवासियांना परिस्थितीती कल्पना देत सहकार्याचे आवाहन केले आहे. देशासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे हे आता सर्वांनीच मान्य केले. ऐकिकडे हे संकट तर दुसरीकडे अस्मानी संकट येऊ घातले आहे. मात्र जेव्हा जेव्हा देशाचा विषय येतो तेंव्हा तेव्हा जनता ऊस्फुर्तपणे प्रतिसाद देते हे देशातील जनतेने अनेक वेळा दाखवुन दिले आहे, अलिकडच्या कोरोना काळात याचा प्रत्यय आला होता. आता देखील जनतेमधुन याबाबत संमिश्र प्रतिसाद, प्रतिक्रिया येत आहेत.

पंतप्रधानांनी' काटकसरीची सप्तसुत्री 'अमलात आणतांना आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी गेली त्याला प्रतिसाद म्हणून गृहमंत्री, लोकसभा पिठासीन अधिकारी यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला. केंद्रीय मंत्री अर्जुन मेघवाल यांनी चक्क ई रिक्षातून प्रवास केला, काही लोकप्रतिनिधी सायकलचा वापर करतांना दिसु लागले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आशिष शेलार यांच्या बरोबर बुलेट वरुन मंत्रालय गाठले. आतातर देशाची सर्वोच्च न्यायव्यवस्था देखील सहकार्य करण्यास पुढे आली आहे, समाजातुन देखील प्रतिसाद मिळत आहे. मात्र नेत्यांचे'फोटोसेशन 'हा एक चर्चेचा विषय ठरत आहे. काटकसरीची सप्तसुत्री जाहीर करण्यात विलंब झाला का, पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होई पर्यंत वाट पाहिली गेली का? या निमित्ताने पुढील संकटाचे तर संकेत दिले गेले नाही ना? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. गेल्या आठवडय़ात अपेक्षित असलेली पेट्रोल आणि डिझेल दरवाढ झाली. इंधन दरवाढीचा वाहतुक जिवनावश्यक वस्तू, यावर परिणाम होतो आणि महागाई वाढते.सोने, चांदीचे चढते भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत, लग्न सराई, धार्मिक सण उत्सव, ईतर कार्य असले कि दागदागिने, खरेदी ही अपरिहार्य ठरते आणि जो तो आपापल्या कुवती नुसार अशी खरेदी करतच असतो. सोन्या, चांदीच्या वाढत्या किमतीमुळे नकली दागदागिने खरेदीकडे मोठा वर्ग वळु लागला आहे.

सामान्य जनतेच्या आर्थिक क्षमतेपलिकडे सोने चांदी खरेदी गेली आहे, काही धनदांडगे, काळा पैसा असलेले, भ्रष्टाचारातुन पैसा कमावलेले अशा वर्गाकडुन सोने चांदी खरेदी होते मात्र सोने खरेदीची' कुवत' आहेच कोणामध्ये?.. ऐकिकडे जनतेच्या मुलभूत गरजा असलेले आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा या सगळ्यांसाठी पैसा पुरत नाही तर सोने चांदी खरेदी करणार कोण?. ऐकिकडे देशातील ऐक्यांशी कोटी जनतेला सरकारच्या पाच किलो धान्यावर जगावे लागते त्यांच्या पैकी कोणामधेही सोने चांदी खरेदी वा परदेशात जाण्याची कुवत आहे? गरीब, मध्यमवर्गीय, नोकरदार, कष्टकरी, कामगार हे महिन्याचा हिशेब जुळवण्यासाठी झगडत आहेत. अगोदरचे शेती ऊत्पादनाचे गंभीर संकट असतांना आता खतांचा वापर कमी करावा असे आवाहन केले जाते आणि नैसर्गिक शेतीकडे वळा असे आवाहन केले जाते मात्र यामुळे शेती ऊत्पादन कमी होणार आणि सगळ्यांचेच खाण्याचे वांधे होणार. ऐकिकडे जनतेच्या मुलभूत गरजा असलेले आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा या सगळ्यांसाठी पैसा पुरत नाही तर सोने चांदी खरेदी करणार कोण?.

देश आर्थिक संकटात आहे, देशासमोर अनेक आव्हाने आहेत, देशावरची कर्ज दोनशे लाख कोटी रुपयांच्या पलिकडे गेले आहे. काटकसर ही काळाची गरज आहे मात्र ती न करता देशाच्या जनतेवर दोनशे लाख कोटी रुपयांच्या वरचे कर्ज कोणी केले? आणि तो पैसा गेला कुठे?. ऐकिकडे देशाची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे, तसेच जगातील तिसऱ्या चौथ्या क्रमांकावरील अर्थव्यवस्थेचे दावे-प्रतिदावे केले गेले मग आजची परिस्थिती ही विसंगती आहे.अगोदरच महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार या समस्या आहेत जनता यासाठी गांभीर्याने झुंजत आहेच तरीही जनता आपापल्या परीने सरकारला साथ देईलच मात्र त्यासाठी कारभारी, पहारेकरी, चौकीदार, राजकिय नेते, कार्यकर्ते, पक्ष, नोकरशहा यांची देखील प्रामाणिक इच्छाशक्ती आणि मानसिकता दिसली पाहिजे. लोकां सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतःमात्र कोरडेपाषाण असे जनतेला चालणार नाही. बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले असे आचरण अगोदर देशाच्या नेतृत्वाने, राजकिय नेत्यांचे असायला हवे तरच जनता गांभीर्याने प्रतिसाद देईल.मात्र आजकालच्या राजकिय नेत्यांचे चाल चलन चरित्र, करनी आणि कथनी मधे जमीन आस्मानाचे अंतर यामुळे जनता नेत्यांना फार गांभीर्याने घेत नाही म्हणूनच नेत्यांचे फोटोसेशन हा विनोदाचा विषय बनला आहे. कै. गणपतराव देशमुख यांच्या सारखे नेते आयुष्यभर एसटी ने फिरले म्हणूनच जनता त्यांना आदर्शवादी मानते.

ऐकुणच येणारा काळ अमृतकाळातील अच्छेदिनांचा नसेल तर संकटकाळ असेल याचे संकेत मिळु लागले आहेत.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## दिग्मुढ

सत्ताबदल चालला
बदलून टाकले मुड
पुढे धावणारे बोले
जरा भाई पिछे मूड

कौलयेता जनतेचा
झाले केवढे दिग्मुढ
कसे झाले आक्रित
कळेना काय रे गूढ

कावळ्यांची जात रे
समजेस्वतास गरुड
अहम् मुळी जाईना
मनावर केले गारुड

हरवून गेले बड्यांना
फुटले नसे मिसरूड
मान्य नाही जनादेश
अजून भलतेचं शुढ

ठरवतात सर्व ज्येते
आता उगवावा सूड
खूप सहन केले बरे
जोरातओढे आसूड

हलवू पाही संस्थान
आपले अस्थीर बूड
किंमतनसे काडीची
उगाचं चाले लुडबुड

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बल्लारपुरातील तरुणाची विसापुरात निर्घृण हत्या



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर येथील गुंडाच्या टोळीने पाठलाग करुन एका तरुणाची निर्घृण हत्या केली. गुंडांच्या टोळीच्या धुमाकूळाने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बल्लारपुरातील तरुणाची विसापुरात निर्घृण हत्या केली. ही घटना विसापूर येथे दिनांक १५ मे २०२६ रोजी सांयकाळी ६ वाजता घडली. विराज आगधारी (वय १७) रा.किल्ला वॉर्ड, बल्लारपूर असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. जुन्या वैमनस्यातून सदर हत्या झालाच्या संशय व्यक्त केला जात आहे. हत्या करून आरोपी फरार झाले असून पोलीस आरोपींच्या मागावर आहे.

बल्लारपूर येथील गुंडाची टोळी दोन मोटार सायकल घेऊन सायंकाळच्या सुमारास विसापूर गावात आले. ५ ते ६ संख्येत असलेल्या टोळीने विराजचा तुकडोजी चौक येथून पाठलाग केला. पहिल्यांदा त्याचेवर गुंडाच्या टोळीने खंजर ने प्रहार केला. मात्र त्याने गुंडाच्या टोळीचा नेम चुकवला. त्याने जिवाच्या आकांताने पळ काढला. गुंडाच्या टोळीने पाठलाग करून विसापूर रेल्वे चौका जवळ असलेल्या अली शेख यांच्या घराच्या फाटकाजवळ विराजला गाठले. त्याच्या डोक्यावर दगडाने प्रहार करुन जागीच ठार केले. या घटनेमुळे विसापूर येथे एकच खळबळ माजली असून ही वार्ता वाऱ्याच्या वेगाने सर्वत्र पसरली. नागरिकांनी घटनास्थळी एकच धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून बल्लारपूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विपीन इंगळे पोलीस ताफ्यासह घटनास्थळी आले. त्यांनी न्यायसहायक प्रयोगशाळेच्या चमुला पाचारण करून घटनेचा पंचनामा सुरू केला. भर रस्त्यावर घडलेल्या घटनेमुळे नागरिकांत दहशत निर्माण झाली आहे. ही घटना जुन्या वैमनस्यातून घडली असावी,असा अंदाज व्यक्त केला जात आहे. विराज ची बहीण घटनास्थळी दाखल झाल्यावर एकच आक्रोश करुन अज्ञात मारेकऱ्यांचे नाव घेत होती. बल्लारपूर पोलीस घटनेचा पुढील तपास करत असून फरार आरोपीच्या मागावर आहे.

## राजुरा यांचे आर्थिक वर्ष २०२५-२६ ची हिशोब पत्रके उपनिबंधक कार्यालयात सादर



**अक्षराज : चंद्रकांत भोयर**

**दि.१६, राजुरा (चंद्रपूर) :** राजुरा नागरी सह. पतसंस्था मर्या. राजुरा जि.चंद्रपुर र न. ९१५ संस्थेची आर्थिक वर्ष २०२५-२६ ची हिशोब पत्रके जिल्हा उपनिबंधक कार्यालय, चंद्रपुर येथे संस्थेचे सरव्यवस्थापक एन.एन.सय्यद यांनी गणेश काळे सहा. निबंधक (प्रशासन) उप निबंधक कार्यालय चंद्रपुर यांचे स्वाधीन केली. संस्थेने नियामक मंडळ व जिल्हा उपनिबंधक यांचे परिपत्रक दिनांक ०८ एप्रिल २०२५ अन्वये ४५ दिवसाचे आत संस्थेची आर्थिक पत्रके सादर केली आहे. संस्थेचे भाग भांडवल ३१ मार्च २०२६ अखेर रु.२२०.३६ कोटी असुन संस्थेचे कर्जवाटप ४५७०.५१ कोटी आहे. संस्थेच्या ठेवी ५५०९.९१ कोटी रु. असुन संस्थेचा छझअ ५ टक्के आहे. संस्थेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.७१.३४ लाख ढोबळ नफा झालेला असुन संस्थेची सभासद संख्या ५६८९ आहे. संस्था सामाजीक बांधीलकी या उपक्रमात संस्था रामनवमी रमजान ईद बौध्द जयंती स्व.पंतप्रधान इंदीरा गांधी जंयती या सारख्या सामाजीक उपक्रमात सक्रीय सहभाग घेत असुन संस्थेचे कार्य प्रगती पथावर असल्याचे यावेळी गणेश काळे सहा.निबंधक (प्रशासन) जिल्हा उपनिबंधक कार्यालय चंद्रपुर यांनी सागीतले.

## शाम नगरातील २ व्यक्तींना चोरीच्या दुचाकीसह अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा आणि परिसरात वाढत्या वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) कारवाई केली आहे.दिनांक १५ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे अत्यंत सतर्कतेने सापळा रचून दोन सराईत आरोपींना ताब्यात घेतले आहे.या कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींकडून एक दुचाकी जप्त केली असून, यामुळे भद्रावती पोलीस स्टेशन अंतर्गत असलेला एक महत्त्वपूर्ण गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आपल्या विश्वसनीय सूत्रांकडून काही संशयित व्यक्तींबाबत अत्यंत गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने तातडीने हालचाली करत संशयितांची ओळख पटवली आणि शाम नगर, चंद्रपूर येथील रहिवासी असलेल्या दोन आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले. यमला तंगराजन कोरवान (वय ४० वर्ष) आणि गोपाल जीवन मालाकर (वय २६ वर्ष) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.पोलिसांनी या दोन्ही आरोपींची कसून चौकशी केली असता, त्यांनी भद्रावती पोलीस स्टेशनच्या हद्दीतून दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी 'हिरो होंडा स्प्लेंडर' कंपनीची दुचाकी (क्रमांक एम.एच ३४ पी ११८०) हस्तगत केली आहे. या जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ५०,०००/- रुपये इतकी सांगण्यात येत आहे.

या यशस्वी कारवाईमुळे भद्रावती पोलीस ठाण्यात दाखल असलेला अपराध क्रमांक ५७४/२५, कलम ३०३ (२) बीएनएस (भारतीय न्याय संहिता) अन्वये दुचाकी चोरीचा गुन्हा पूर्णपणे उघडकीस आला आहे. ही धडक कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या सक्षम पथकाने अत्यंत चोखपणे पार पाडली. या शोध मोहिमेत आणि अटकेच्या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले,पोलीस उपनिरीक्षक सुनील गौरकार यांच्यासह पोलीस हवालदार सुभाष गोहोकार, सतीश अवथरे, रजनिकांत पुट्ठावार, दीपक डोंगरे, इमान खान तसेच पोलीस अंमलदार हिरालाल गुप्ता, किशोर वाकाटे आणि शशांक बदामवार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.स्थानिक गुन्हे शाळेच्या या यशस्वी कामगिरीमुळे वाहन चोरांचे धाबे दणाणले असून नागरिकांनी पोलिसांच्या या तत्परतेचे कौतुक केले आहे.

## बनावट डॉक्टर विरोधात राहुरी पोलिसांची कारवाई; उपचारासाठी वापरलेली औषधे जप्त

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१६, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी शहरातील गॅलेक्सी निसर्ग उपचार केंद्रात बोगस वैद्यकीय व्यवसाय चालविल्याप्रकरणी तन्वीर हारुन देशमुख याच्याविरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपासादरम्यान आरोपीने उपचारासाठी वापरण्यात येणारी औषधे जाळल्याची माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने ती औषधे जप्त केली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तन्वीर हारुन देशमुख (रा.प्लॅटीनम प्राईड, औदुंबर कॉलनी, ताठे मळा, सावेडी, जि.अहिल्यानगर, सध्या रा.बारागाव नांदूर, ता.राहुरी) हा राहुरी शहरातील रोशन कॉम्प्लेक्स शेजारी, नगर-मनमाड महामार्गालगत असलेल्या गॅलेक्सी निसर्ग उपचार केंद्र येथे वैद्यकीय व्यवसाय करत होता. मात्र, त्याच्याकडे महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन किंवा नॅशनल कौन्सिलचे कोणतेही अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र नसताना तो रुग्णांवर उपचार करत असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. तसेच आरोपीने विविध उपचार पद्धतींचा




वापर करून रुग्णांच्या हिताला बाधा पोहोचेल असे उपचार दिल्याचे समोर आले आहे. डॉक्टर या शब्दाचा गैरवापर केल्याबरोबरच वैद्यकीय व्यवसायासाठी बनावट पदवी प्रमाणपत्रे तयार करून सादर केल्याचेही उघड झाले आहे.

यासंदर्भात राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश बाबासाहेब मिसाळ यांनी चौकशीअंती राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ५०२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१९(२), ३१८(४), ३३६(३), ३४०(२) तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ मधील कलम ३४, ३६ व ३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, राहुरी येथील दिवाणी वरिष्ठ स्तर न्यायालयातील रेग्युलर सिव्हिल सूट क्रमांक ३६५/२०२५ मध्ये दि. ११ मे २०२६ रोजी न्यायालयाने महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर कायदा १९६१ अंतर्गत तन्वीर देशमुख याच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याची माहितीही समोर आली आहे.

तपासादरम्यान आरोपीने रुग्णांवर उपचारासाठी वापरण्यात येणारी औषधे बारागाव नांदूर रोड परिसरात जाळल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी जाऊन फॉरेन्सिक टीमच्या मदतीने संबंधित औषधे जप्त केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे व पोलीस हेड कॉन्स्टेबल सतीश आवारे करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

## नाफेड व एनसीसीएफची कांदा खरेदी शेतकरी हिताची नाही; जयदत्त होळकर

### सरकारी खरेदी म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** राज्यातील कांद्याचे दर कमालीचे कोसळल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने आजपासून महाराष्ट्रात प्रतिकिलो १२ रुपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी सुरू केली आहे. मात्र, ही खरेदी प्रत्यक्षात शेतकरी हिताची नसून निव्वळ फार्स असल्याची घणाघाती टीका मुंबई व लासलगाव बाजार समितीचे सदस्य जयदत्त होळकर यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारमार्फत 'नाफेड' (NAFED) आणि 'एनसीसीएफ' (NCCF) च्या माध्यमातून कांदा खरेदी सुरू होत असल्याची घोषणा केली. किंमत स्थिरीकरण निधीअंतर्गत (Price Stabilization Fund) राज्यातून दोन लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापैकी प्रत्येकी एक लाख टन कांदा दोन्ही संस्थांमार्फत खरेदी केला जाणार आहे.या पार्श्वभूमीवर आपली तीव्र प्रतिक्रिया देताना जयदत्त होळकर म्हणाले की, राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याला प्रतिकिलो



अवघे ५० पैसे ते २ रुपये इतका नीचांकी दर मिळाल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाहीये. शेतकरी मोठ्या संकटात असताना सरकारकडून ठोस मदतीची अपेक्षा होती. मात्र, केंद्र शासनाने जाहीर केलेले कांदा खरेदीचे निकष आणि दर हे वास्तव परिस्थितीशी पूर्णपणे विसंगत आहेत.

**कडक निकष आणि कमी दर; फायदा कसा होणार?**

सरकारी खरेदीसाठी फक्त 'ग्रेड-ए' दर्जाचाच कांदा स्वीकारला जाणार आहे. विळा लागलेला, पत्ती निघालेला, काजळी असलेला, रंग गेलेला, उन्हामुळे चट्टे पडलेला, आकार बिघडलेला, कोंब फुटलेला, नरम किंवा बुरशीजन्य कांदा नाकारला जाणार असल्याचे निकष जाहीर करण्यात आले आहेत. यावर आक्षेप घेत होळकर यांनी सांगितले की, सध्या नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये 'ग्रेड-ए' दर्जाचा चांगला कांदा प्रतिकिलो १३ ते १४ रुपये दराने विकला जात आहे, तर सर्वसाधारण दर्जाच्या कांद्यालाही १० ते १२ रुपये दर मिळत आहे. जर खुल्या बाजारातच यापेक्षा चांगला दर असेल, तर १२ रुपये ३५ पैसे दराने होणारी ही कडक निकषांची सरकारी खरेदी शेतकऱ्यांसाठी फायदेशीर कशी ठरणार?

**उत्पादन खर्चापेक्षा कमी दर, ३ ते ५ रुपयांचा तोटा**

सध्या कांदा उत्पादनासाठी शेतकऱ्यांना प्रति किलो साधारणतः १५ ते २० रुपये खर्च येत आहे. असे असताना केंद्र सरकार मात्र १२ रुपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी करत आहे. म्हणजेच शेतकऱ्यांना थेट प्रति किलो ३ ते ५ रुपये तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे ही खरेदी शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

**भविष्यात ही बाजारभाव पडण्याची भीती**

केंद्र सरकार या कमी दरात कांदा खरेदी करून स्वतःचा बफर स्टॉक (Buffer Stock) तयार करत आहे. भविष्यात जेव्हा बाजारात कांद्याचे भाव वाढतील, तेव्हा हाच कांदा महानगरांच्या किरकोळ बाजारात विक्रीसाठी आणून सरकार पुन्हा बाजारातील भाव पाडेल, अशी भीती होळकर यांनी व्यक्त केली. त्यामुळे सरकारची ही योजना खरोखर शेतकरी हिताची आहे की त्यांच्यासाठी मारक, अशी शंका निर्माण होते.

**थेट बाजार समित्यांमध्ये स्पर्धात्मक खरेदी करा!**

नाफेड आणि एनसीसीएफ यांनी केवळ पोर्टलवर नोंदणी केलेल्या निवडक शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करू नये. त्याऐवजी त्यांनी थेट बाजार समित्यांच्या लिलावात उतरून व्यापाऱ्यांप्रमाणे स्पर्धात्मक दराने कांदा खरेदी करावा, अशी आग्रही मागणी जयदत्त होळकर यांनी केली आहे. यामुळे बाजार समित्यांमध्ये कांदा विक्रीसाठी येणाऱ्या प्रत्येक सर्वसामान्य शेतकऱ्याला सरकारी खरेदीचा थेट आणि खरा लाभ मिळू शकेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## डिझेल टंचाईमुळे सोयगाव तालुक्यातील शेतकरी संकटात

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१६, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सध्या सोयगाव शहरासह संपूर्ण तालुक्यात शेतीच्या मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून शेतकरी आधुनिक युगात ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची कामे करत आहेत. मात्र महाराष्ट्रासह देशभरात निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा तुटवडा जाणवत असून शेतकरी बांधव मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सध्या प्रशासनाच्या आदेशानुसार ट्रॅक्टरमध्ये केवळ २० लिटर तर मोठ्या वाहनांमध्ये २०० लिटर डिझेल देण्याचे निर्देश पेट्रोल पंप चालकांना देण्यात आले आहेत. मात्र शेतीची मशागत, नांगरणी, पेरणीपूर्व तयारी यासाठी ट्रॅक्टरला मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता असते. त्यामुळे २० लिटर डिझेलमध्ये शेतकरी शेतीची मशागत कशी करणार? असा सवाल शेतकरी बांधवांकडून उपस्थित केला जात आहे.

सोयगाव शहरातील प्रतिष्ठित शेतकर डॉक्टर नाना पायघन यांनी सांगितले की, शेतकऱ्यांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा हंगाम आहे. मशागतीची कामे वेळेत झाली नाहीत तर पेरणीवर परिणाम होईल. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना विशेष सवलत देऊन अधिक डिझेल उपलब्ध करून द्यावे.

दरम्यान भारत पेट्रोलियम तसेच ओम साई पेट्रोल पंपाच्या मालकांशी

● जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार आम्ही मर्यादित प्रमाणात डिझेल वाटप करत आहोत. उपलब्ध साठा सर्व शेतकरी व वाहनधारकांना मिळावा यासाठी नियोजन केले जात आहे. डिझेलचा पुरवठा नियमित झाल्यानंतर परिस्थिती पूर्ववत होईल.

**- एडवोकेट योगेश पाटील (भारत पेट्रोलियम पंप मालक, सोयगाव.)**

संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आम्हाला डिझेल-पेट्रोलचे मर्यादित वाटप करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत.उपलब्ध साठा सर्वांना मिळावा यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने इंधन वाटप केले जात आहे.

संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र संपर्क होऊ शकला नाही. शिंदे शिवसेनेचे रमेश गव्हांडे यांनी प्रशासनाकडे मागणी करताना सांगितले की,शेतकरी बांधवांची अडचण लक्षात घेऊन तहसील प्रशासनाने ट्रॅक्टरसाठी स्वतंत्र डिझेल कोटा किंवा विशेष व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्यावी. डिझेल टंचाईमुळे सध्या अनेक गावांतील शेतकऱ्यांची मशागतीची कामे खोळंबली असून,वेळेत पाऊस आल्यास पेरणीवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

## गुलशन कॉलनीतील भीषण आगीत संसार राख; लोकप्रतिनिधी धावले मदतीला

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१५, जिंतूर (परभणी) :** जिंतूर शहरातील गुलशन कॉलनी परिसरात लागलेल्या भीषण आगीत एका गरीब महिलेचा संसार अक्षरशः राख झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. अचानक लागलेल्या आगीमुळे घरातील संसारोपयोगी साहित्य, कपडे, अन्नधान्य व इतर महत्त्वाच्या वस्तू जळून खाक झाल्याने संबंधित महिला मोठ्या संकटात सापडली होती. घटनेची माहिती मिळताच परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या



वैद्यकीय मदत कक्षाने तातडीने पुढाकार घेत आगग्रस्त महिलेला मदतीचा हात दिला.


या मदत उपक्रमांतर्गत महिलेला दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेले साहित्य, कपडे तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. संकटाच्या काळात प्रशासन व लोकप्रतिनिधींनी दाखवलेल्या संवेदनशीलतेमुळे परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी जिंतूर नगरपरिषदेचे गटनेते मुन्ना भैय्या गौरे, उपनगराध्यक्ष मोहसीन खान, नगरसेवक शेख अथर, शेख अलीम,अक्षय सूर्यवंशी तसेच समीर जानीमियाँ यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी आगग्रस्त कुटुंबाला धीर देत पुढील काळातही मदतीचे आश्वासन दिले. गुलशन कॉलनीतील या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांनी अशा आपत्तीग्रस्त कुटुंबांना अधिकाधिक मदत करण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हा आरोग्य विभागात बायोमेट्रिक घोटाळ्याचा स्फोट; दोषींवर कारवाईची मागणी










अक्षराज : प्रमोद डफळ

**दि.१६, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये बायोमेट्रिक आणि फेस रीडिंग उपस्थिती प्रणालीला बगल देत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लाखो रुपयांचे वेतन उचलल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणामुळे आरोग्य विभागात मोठी खळबळ उडाली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते सुभाष सूर्यभान गोरे यांनी सातत्याने तक्रारी दाखल केल्यानंतर उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, शासनाच्या आदेशानुसार सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक आणि फेस रीडिंग प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविणे बंधनकारक आहे. मात्र, काही ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये ही प्रणाली वापरलीच जात नसल्याचे समोर आले आहे. उपस्थिती नोंद नसतानाही संबंधितांना नियमित वेतन वितरित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात नेवासा, राहुरी, ताहराबाद आणि वांबोरी येथील ग्रामीण रुग्णालयांतील काही वैद्यकीय अधीक्षक व संबंधित अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले असून, कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. संबंधितांकडून अतिरिक्त घेतलेली रक्कम वसूल करून त्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते सुभाष सूर्यभान गोरे यांनी दि. १० मार्च ते १३ मार्च २०२६ दरम्यान सलग तक्रारी दाखल करून हा प्रकार उघडकीस आणला. त्यांच्या पाठपुराव्यानंतर अखेर आरोग्य विभागाने चौकशीचे आदेश काढले.

या आदेशामुळे जिल्हा आरोग्य विभागातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, सामान्य कर्मचाऱ्यांवर नियमांची सक्ती आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना मोकळीक का? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. या कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांनी केली आहे.

आरोग्य विभागातील या कथित आर्थिक गैरव्यवहारामुळे शासनाच्या पारदर्शक कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, चौकशी अहवालात नेमकी कोणाची नावे समोर येतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# निफाड तालुक्यात 'डिजिटल जनगणने'चा श्रीगणेशा; ६३२ प्रगणक जाणार घराघरांत!

## * १४ जूनपर्यंत चालणार मोहीम; नागरिकांनी घाबरू नये, जिल्हाधिकारी व तहसीलदारांचे आवाहन

## * कागदपत्रे किंवा 'ओटीपी' देण्याची गरज नाही; ३३ प्रश्नांच्या आधारे होणार माहितीचे संकलन

अक्षराज : सुनील क्षिरसागर

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी डिजिटल जनगणना मोहिमेअंतर्गत निफाड तालुक्यात शनिवार, दि.१६ मे २०२६ रोजी प्रत्यक्ष घराघरांत जाऊन माहिती संकलनाच्या प्रक्रियेला उत्साहात सुरुवात झाली आहे. आगामी १४ जून २०२६ पर्यंत ही मोहीम सुरू राहणार असून, तालुक्यातील ६३२ प्रगणक नागरिकांच्या घरी भेट देऊन डिजिटल स्वरूपात माहितीची नोंदणी करणार आहेत.

या मोहिमेत नागरिकांनी प्रगणकांना कोणतीही कागदपत्रे किंवा मोबाईलवर आलेला ओटीपी (OTP) देण्याची आवश्यकता नाही. नागरिकांनी केवळ विचारलेल्या प्रश्नांची अचूक व खरी माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन निफाडचे तहसीलदार तथा चार्ज अधिकारी विशाल नाईकवाडे यांनी केले आहे. यापूर्वी दि.०१ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांना मोबाईलद्वारे 'स्वगणना' करण्याची ऐच्छिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

डिजिटल जनगणनेचा हा टप्पा यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विशाल नाईकवाडे हे मुख्य चार्ज अधिकारी म्हणून, तर राहुल मुळीक हे अतिरिक्त चार्ज अधिकारी म्हणून संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवत आहेत.

- एकूण प्रगणक : ६३२
- पर्यवेक्षक (Supervisors) : १०६
- निश्चित केलेले ब्लॉक्स : ६३२ (प्रत्येक ब्लॉकमध्ये साधारण १५० ते २०० घरे)

**डिजिटल ॲपद्वारे विचारले जाणार '३३' प्रश्न**

प्रत्यक्ष घराघरांत जाणारे प्रगणक त्यांच्याकडील विशेष डिजिटल ॲप किंवा उपकरणाद्वारे कुटुंबाची माहिती नोंदवून घेतील. यामध्ये मुख्यत्वे खालील मुद्द्यांसह एकूण ३३ प्रश्नांचा समावेश असेल :-

- इमारत व घर क्रमांक आणि घराचे अचूक स्थान.
- कुटुंब प्रमुखाचे नाव आणि कुटुंबातील एकूण सदस्य संख्या.
- सदस्यांचे लिंग, प्रवर्ग आणि विवाहित जोडप्यांची माहिती.
- घरातील खोल्यांची संख्या, उपलब्ध भौतिक सुविधा, मालमत्ता आणि गृहोपयोगी साहित्य.




माहिती पूर्णपणे गोपनीय व सुरक्षित!

या जनगणनेच्या अंतर्गत नागरिकांकडून गोळा केली जाणारी सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित ठेवली जाईल. त्यामुळे नागरिकांनी मनात कोणतीही भीती किंवा शंका न बाळगता प्रगणकांना विश्वासाने खरी व अचूक माहिती द्यावी.

**- आयुष प्रसाद (जिल्हाधिकारी)**

# चंद्रपुरात ओबीसींचे थाळी बजाओ आंदोलन

अक्षराज : वसंत वडस्कर

**दि.१६, चंद्रपूर :** जनगणना २०२६ प्रक्रियेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश न केल्याच्या निषेधार्थ सकल ओबीसी समाज आणि ओबीसी सेवा संघ, चंद्रपूर यांच्या वतीने शुक्रवार, दि. १५ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार 'थाळी बजाओ आंदोलन' करण्यात आले. थाळ्या वाजवत आणि सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणून सोडत ओबीसी समाजाने आपल्या हक्कांसाठी आक्रमक भूमिका घेतली. 'ओबीसींना न्याय द्या', जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलम द्या', ज्यांची जेवढी संख्या तेवढा वाटा' अशा घोषणांनी आंदोलनस्थळी वातावरण तापले होते. आंदोलनकर्त्यांनी सरकारवर ओबीसी समाजाच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत तीव्र नाराजी व्यक्त केली.

यावेळी ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल डहाके यानी सरकारला थेट इशारा देताना म्हटले की, जनगणनेत तुम्हा आम्हाला मोजले नाही तर येणाऱ्या निवडणुकीत ओबीसी समाज तुम्हाला मोजणार नाही. त्यांनी पुढे सांगितले कि, ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या देशासमोर येणे अत्यंत आवश्यक असून, त्याशिवाय शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आरक्षणाचे योग्य मोयोजन होऊ शकत नाही. 'ओबीसींना 'इतर' या वर्गात टाकणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वावर घाला घालण्यासारखे आहे. सरकारने तात्काळ स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करावा, अन्यथा राज्यभर उग्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आंदोलना दरम्यान केंद्र आणि राज्य शासनावर ओबीसी समाजाच्या मागण्यांकडे सातत्याने दुरलक्ष केल्याचा आरोप करण्यात आला. आंदोलनाच्या




माध्यमातून शासनाला निवेदन सादर करण्यात आले असून, आगामी काळात राज्यव्यापी जनजागृती, मोर्चे आणि तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्धार ही व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात डॉ. अनिल डहाके, ॲड. विलास माथनकर, नंदू नागरकर, ॲड. पुरुषोत्तम सातपुते, शेरीधर मालेकर, संदीप गिऱ्हे, विजय टोंगे, भाविक येरगुडे, इरफान शेख, राजु बनकर, ॲड. दत्ता हजारे, महापौर संगीता खांडेकर, स्थायी समिती अध्यक्ष मनस्वी गिऱ्हे, सुनंदा धोबे, मनिषा बोबडे, शृती घटे, ॲड.कुंदा जेनेकर, ॲड. वैशाली कवाडे, श्याम राजुरकर, संजय ढवस, आकाश साखरकर, सुनिता लोढीया, बळीराज धोटे, गोमती पाचभाई, वनश्री मेश्राम, अरविंद मुसळे, प्रवीण पडवेकर, मोरोती मत्ते, डॉ.दाभेरे, हिराचंद बोरकुटे, अंकुश वाघमारे, आनंद बावणे, महादेव ढुमणे, दिपक जेऊळकर, सुधाकर काकडे, भास्कर सपाट, बाबा जीवतोडे, बंडू धोटे, गुलाब जीवतोडे, निळकंठ पावडे, बबन राजुरकर, सागर वानखेडे, अक्षय येरगुडे, भाऊराव झाडे, प्रभाकर पारखी उपस्थित होते.

# कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेसाठी "POSH' कायद्याची कडक अंमलबजावणी; राज्यभर तपासणी मोहीम

अक्षराज : जे.के.पोळ

**दि.१६, मुंबई :** राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३' अर्थात POSH कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाने दिले आहेत.

यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाने महत्त्वपूर्ण शासन परिपत्रक जारी केले असून, विविध आस्थापनांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

राज्यातील ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्या सर्व ठिकाणी अंतर्गत तक्रार निवारण समिती (Internal Committee - IC) स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या समितीमध्ये किमान ५० टक्के महिला सदस्य असणे, वरिष्ठ महिला कर्मचारी अध्यक्ष म्हणून नियुक्त करणे तसेच बाह्य स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधीचा समावेश असणे आवश्यक राहणार आहे.

महिलांच्या तक्रारींसाठी ई-मेल, लेखी अर्ज तसेच SHE-Box पोर्टल यांसारखी विविध माध्यमे उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही शासनाने दिल्या आहेत. तक्रार प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत कार्यवाही सुरू करणे, चौकशी दरम्यान गोपनीयता राखणे तसेच पीडित महिलेला आवश्यकतेनुसार अंतरिम दिलासा देणे याबाबतही स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

महिला व बाल विकास विभागाने झजडक अनुपालनासाठी विशेष तपासणी सूची तयार केली असून, त्यामध्ये POSH धोरण, जनजागृती कार्यक्रम, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वार्षिक अहवाल, सुरक्षित कार्यस्थळ आणि SHE-Box पोर्टलवरील नोंदणी यांसारख्या ३१ मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून प्रत्येक आस्थापनामध्ये कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याची पडताळणी केली जाणार आहे.

तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्यास POSH Act 2013 च्या कलम २६ नुसार संबंधित आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. महिलांना सुरक्षित, सन्मानजनक आणि संवेदनशील कार्यस्थळ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाची ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# थोडक्यात

## छ.संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा व भव्य व्याख्यानाचे आयोजन



अक्षराज : दत्ता हमंद

**दि.१६, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील छावा मराठा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त दि.२० मे २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता शहरातील के. रामलू मंगल कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा व स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज या विषयावरील ३ दिवसाचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी नुकत्याच इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा आणि पत्रकारांचा सुद्धा सन्मान छावा मराठा संघटनेच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती छावा संघटनेचे शहराध्यक्ष प्रा.डॉ.माधव हळदेकर यांनी दिली आहे.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार तर प्रमुख म्हणून प्रसिद्ध व्याख्याते तथा जिजाऊ ब्रिगेडच्या प्रवक्त्या डॉ.भारती मढवई,आणि प्रमुख मान्यवर म्हणून छावाचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष इंजि.तानाजी हुस्सेकर,संघटक प्राचार्य डॉ.कमलाकर कनसे, प्रवक्ते डॉ.प्रभाकर जाधव, जिल्हाध्यक्ष इंजि.प्रवीण जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून उपनगराध्यक्षानेहा ऱ्याकावार, सोसायटी चेअरमन सुनिल बेजगमवार,सोसायटी मा.चेअरमन साईनाथ उत्तरवार, उपनगराध्यक्ष डॉ.विठ्ठलराव कुडमुलवार, उपाध्यक्ष ह.गो.पा.शि.प्र.मं.अर्जापुरचे राजेश्वरराव उत्तरवार, उपाध्यक्ष दक्षिण भाजपा व्यापारी आघाडी नांदेडचे दिनेश दाचावार, धर्माबादचे उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे आणि सर्व नगरसेवक, नगरसेविका यांची उपस्थिती राहणार असून या जन्मोत्सव सोहळयास आणि व्याख्यानास बिलोली, धर्माबाद तसेच कुंडलवाडी शहर व पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शहराध्यक्ष प्रा.डॉ.माधव हळदेकर यांनी केले आहे.

## महावितरणचा मनमानी कारभार !

### महाबळेश्वर येथे वारंवार विज खंडित



अक्षराज : रियाज मुजावर

**दि.१६, महाबळेश्वर :** महाबळेश्वर शहरातील वीजपुरवठ्याच्या बोजवारा उडाला आहे नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. गेल्या काही दिवसांपासून दररोज संध्याकाळच्या वेळी वीज गायब होत असल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, महावितरणच्या कारभारावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शहरातील अनेक भागात सकाळ पासूनच वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे तासनतास वीज नसतानाही महावितरणची संबंधित यंत्रणा याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तक्रार निवारण केंद्राशी संपर्क साधला असता समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत अथवा लॅंडलाइन फोन बंद करून ठेवला जात आहे या मुळे तीव्रसंताप व्यक्त होत आहे.

**पर्यटन आणि व्यवसायाला मोठा फटका !**

आता कुठे पर्यटकांची येण्यास सुरुवात झाली आहे तर संध्याकाळच्या वेळी विज पुरवठा खंडीत होत आहे संध्याकाळी शहरात पर्यटकांची खरेदी साठी गर्दी होत असताना नेमक्या याच वेळी वीज गायब होत असल्याने बाजार पेठ अंधारमय होत आहे दुकानदार, हॉटेल, रेस्टॉरंट्, व्यवसायिकांना अंधारामुळे ग्राहकांना सेवा देण्यात अडचणी येत आहेत. सोयी-सुविधांच्या अभावामुळे पर्यटकांचा हिरमोड होत आहे, अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपला संताप व्यक्त केला आहे. यामुळे महाबळेश्वर शहराच्या पर्यटनावरही नकारात्मक परिणाम होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे. या वर लवकरात लवकर तोडगा निघाला पाहिजे अन्यथा महा वितराणाच्या विरोधात आंदोलन केले जाईल असा इशारा महाबळेश्वर वासियांनी दिला आहे.

## संजय भोकरे यांना तातडीने संरक्षण देण्याचे मुख्यमंत्री यांचे आदेश

अक्षराज : जे. के. पोळ

**दि.१६, नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांच्या पाठीशी राज्य सरकार खंबीरपणे उभे राहणार असून त्यांना तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सांगली पोलिसांनी संजय भोकरे यांच्यावरील खुनाचा कट उधळून लावून तीन आरोपींना शस्त्रास्त्रांसह अटक केली असून, त्यांच्याकडून दोन पिस्तूलं, चार जिवंत काडतूसं आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा मिळावी याकरिता निवेदन देण्यात आले, त्याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी सदर आदेश दिले.

सदर भेटी प्रसंगी मुख्यमंत्री म्हणाले की, मी संजय भोकरे यांना पुर्णपणे ओळखतो, त्यांचे पत्रकारिता क्षेत्रात, तसेच शैक्षणिक व सामाजिक कार्यात मोलाचे योगदान असून अशा लोकांची सुरक्षा करणे हे आमच्या सरकारचे काम आहे.

भोकरे यांना पोलीस संरक्षण देण्याचे आदेश दिले असून मी सांगलीतील घटनेचा निषेध व्यक्त करतो. महाराष्ट्र हे सुजलाम सुफलाम राज्य असून गुंडगिरीचा बंदोबस्त करण्यासाठी आमच्या सरकारने या प्रकरणात लक्ष घातले आहे, पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे. पोलीस यंत्रणा या प्रकरणाचा छडा लावण्यात यशस्वी ठरेल, असा मला विश्वास असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ. विश्वास आरोटे, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, मंत्रालय संपर्कप्रमुख विष्णू बुरे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसेडर संजय फुलसुंदर, आणि संघाचे सदस्य खंडूराज गायकवाड यांचा शिष्टमंडळात समावेश होता. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भोकरे यांना संरक्षण देण्याची मागणी मान्य केली.